राज्यातील सार्वजनिक विद्यापीठामधील (अकृषि) सांविधिक पदांच्या भरती प्रक्रीयेमध्ये अधिक पारदर्शकता आणण्यासाठी कार्यपध्दती विहित करण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**उच्च व तंत्र शिक्षण विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : संकिर्ण -२०२५/ई.१०५९४२१/विशि-१**
मंत्रालय विस्तार भवन, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक,मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,
दिनांकः- ६ ऑक्टोबर, २०२५

**वाचा:-**

१.महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६.
२.शासनाचे पत्र क्र.संकिर्ण-२०२५/ई-८६०४२१/विशि-१,दि.२८.०८.२०२५.
३.अवर सचिव, राजभवन यांचे पत्र क्रमांक आरबी/जीइएन-२०२४/सीआर९२८/इडीएन . ५ /७९६, दि.१८.०९.२०२५.

**प्रस्तावना:-**

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ दिनांक ०१ मार्च, २०१७ पासून लागू करण्यात आला आहे. सदर अधिनियमान्वये उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या अधिपत्याखालील राज्यातील सार्वजनिक विद्यापीठांसाठी (अकृषि) सांविधिक पदांची तरतूद करण्यात आलेली आहे. सदर सांविधिक पदांच्या नियुक्तीसाठी आवश्यक असलेली शैक्षणिक अर्हता / पात्रता, अनुभव याबाबतची तरतूद सदर अधिनियमान्वये तसेच विविध शासन आदेशान्वये विहीत करण्यात आलेली आहे.

उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या अधिपत्याखालील राज्यातील अकृषि विद्यापीठांसाठी सांविधिक पदांची निवड प्रक्रीया अधिक पारदर्शक व्हावी यासाठी मा.कुलपती तथा राज्यपाल महोदयांच्या कार्यालयाकडून प्राप्त झालेले निर्देश विचारात घेऊन कार्यपध्दती विहित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:-**

उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या अधिपत्याखालील राज्य सार्वजनिक विद्यापीठांमधील (अकृषि) सांविधिक पदांच्या निवड प्रक्रीयेसाठी सोबतच्या **परिशिष्ट-अ** नुसार कार्यपध्दती विहित करण्यात येत आहे.

२. वरील कार्यपध्दतीनुसार राज्यातील सार्वजनिक विद्यापीठांमधील सध्या सुरू असलेल्या सांविधिक पदांची निवडप्रक्रिया पूर्ण करण्यास याव्दारे मान्यता देण्यात येत आहे. तसेच भविष्यात

होणाऱ्या राज्यातील सार्वजनिक विद्यापिठांमधील सांविधिक पदांच्या निवड प्रक्रियेकरता या कार्यपध्दतीचा अवलंब करण्यात यावा.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२५१००६१८३५१९९६०८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

PRATAP PANDURANG LUBAL

Digitally signed by PRATAP PANDURANG LUBAL
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=HIGHER AND TECHNICAL EDUCATION DEPARTMENT, 2.5.4.20=b0d6763338fc6cc4f7cf07ca60db7abc1cfac99c84ab1b5bfc0dae4609d631d0, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=AF6895C47A84066432F58DD1F182B4163D880AC9BD8D24A198FD0E73108BE859, cn=PRATAP PANDURANG LUBAL
Date: 2025.10.06 18:36:28 +05'30'

**(प्रताप पां. लुबाळ)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. मा. राज्यपाल तथा कुलपती यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई.
२. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा. उप मुख्यमंत्री (नगर विकास) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. मा. उप मुख्यमंत्री (वित्त व नियोजन) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई
५. मा. विरोधी पक्ष नेता, विधानसभा / विधानपरिषद.
६. मा. मंत्री, उच्च व तंत्रशिक्षण यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
७. मा. राज्यमंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
८. अपर मुख्य सचिव, उच्च व तंत्र शिक्षण, मंत्रालय, मुंबई.
९. सर्व सह सचिव / उप सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०. संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
११. सर्व विभागीय सहसंचालक, उच्चशिक्षण,
१२. सर्व कुलसचिव, सार्वजनिक विद्यापीठे.
१३. सर्व कुलसचिव, राज्य अभिमत विद्यापीठे.
१४. सर्व कुलसचिव, महाराष्ट्र राष्ट्रीय विधी विद्यापीठे,
१५. कुलसचिव, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ नाशिक.
१६. कुलसचिव, कवि कुलगुरू कालिदास संस्कृत विद्यापीठ, रामटेक.
१७. कुलसचिव, राज्य समुह विद्यापीठे.
१८. निवड नस्ती (विशि-१).

परिशिष्ट-अ

(शासन निर्णय क्र. संकिर्ण -२०२५/ई.१०५९४२१/विशि-१, दि. ६ ऑक्टोबर, २०२५ सोबतचे सहपत्र)

**Revised Selection procedure for the Statutory Positions in state public universities (Non-Agricultural)**

**Weightage for Selection to the Statutory Posts, Prescribed in the Maharashtra Public Universities Act, 2016**

| Sr. No. | Criteria | Statutory Posts | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | **Registrar** | **Director, Board of Examination & Evaluation** | **Finance & Accounts Officer** | **Director of Sub-campus** | **Director of Innovation, Incubation & Linkages** | **Director of Lifelong Learning and Extension** |
| 1. | **Educational Qualifications** | 50 | 50 | 50 | 50 | 50 | 50 |
| | **Assessment through Interview** | | | | | | |
| 1 | **Experience in Years Relevant to the Post** | 20 | 20 | 20 | 20 | 20 | 20 |
| 2 | **Domain Skills Relevant to the Post** | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 |
| 3 | **Research and IPR Experience** | - | - | - | - | - | - |
| 4 | **Vision and Planning Relevant to the Post** | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 |
| 5 | **Assessment of Knowledge of University Act, Statutes, Ordinances, Regulations, Regulatory Bodies, Communication and Language Proficiency etc** | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 |
| | **Total Marks** | **100** | **100** | **100** | **100** | **100** | **100** |

2. A **merit list** will be prepared based on the combined score (out of 100). The **average score awarded by all selection committee members** must be used to finalize the interview scores.

3. While assigning marks under each criterion, Selection Committee shall consider relevant aspects concerned with the statutory post to be filled in.

4. In case of Educational Qualification, 50% marks shall be assigned, when candidate fulfils required minimum qualification, while remaining 50% marks shall be assigned for the additional qualification acquired by the candidate, which is relevant to the post. Marks for the experience shall also be assigned on the similar line.

5. Marks to the Domain Skills and Vision and Planning shall be based on the presentation made by the candidate at the time of Interview.

6. **Proceedings of the Selection Committee meeting shall be recorded and the same shall be sealed with the signatures of all committee members present immediately after the process is complete**. Such record shall be treated as confidential and shall be made available only if required by the court of law.

7. The **results shall be announced on the same day or the following day** after the selection process **is complete.**
8. **The selection process for the posts of Dean, Director, Knowledge Resource Centre, and Director, Sports and Physical Education shall be as per the Process and Corresponding GR for the selection of Professor.**

---